विद्यापीठ अनुदान आयोग व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## राष्ट्रीय चर्चासत्र

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाड्.मय




(प्रोसिडिंग)

ISBN-978-93-83401-45-1

दि.२३ व २४ सप्टेंबर २०१६

संपादक: डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्‌मय

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

राष्ट्रीय चर्चासत्र

दि. २३ ते २४ सप्टेंबर

आयोजक

**मराठी विभाग**

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

प्रमुख मार्गदर्शक

**प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे**

सल्लागार संपादक

**डॉ. सुनीता भांगेपाटील**

संपादक

**डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे**

संपादक मंडळ

**प्रा. मीना कोहोक**

**डॉ. महेबुब सय्यद**

**डॉ. नवनाथ येठेकर**

**ISBN – 978-93-83401-45-1**

**यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्‌मय**

ISBN – 978-93-83401-45-1
सप्टेंबर २०१६.

Sonpeth
Pin-431516
Ta Sonpeth Dist.Parbhani

**संपादक**

डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

©
प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे
न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर
ता.जि. अहमदनगर—४१४००१ महाराष्ट्र

**प्रकाशन**
शब्दगंध प्रकाशन
फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, तपोवन रोड,
कसबे वस्ती, सावेडी, अहमदनगर.

**मुद्रक**
शिवमंगल कलेक्शन

**प्रथमावृत्ती**
२३ सप्टेंबर २०१६

**मुखपृष्ठ**
श्री. सतीश कुलकर्णी

---

(या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील विचारांशी संपादक मंडळ, प्राचार्य, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

| अ.नं. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| ३५ | 'यशवंतरावांचे भाषा व साहित्यविषयक विचार' | प्रा.डॉ. नकुलवाड दत्तात्रय सोमनाथ | १६४ ते १६९ |
| ३६ | यशवंतराव चव्हाणांचे राजकीय विचार | प्रा.डॉ.आंधळे बी. व्ही. | १७० ते १७२ |
| ३७ | महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण:व्यक्ती आणि साहित्यिक कार्य | डॉ. सोनसळे सा.द. | १७३ ते १७६ |
| ३८ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. शिंदे बी. आर. | १७७ ते १८० |
| ३९ | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक योगदान | प्रा. दहिफळे रामकिशन | १८१ ते १८३ |
| ४० | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र— कृष्णाकाठ | वाकोळे संगीता माधवराव | १८४ ते १८८ |
| ४१ | यशवंतराव चव्हाणांचे साहित्यिक योगदान | प्रा. डॉ. बोडखे जी पी. | १८९ ते १९१ |
| ४२ | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार — यशवंतराव चव्हाण | डॉ. काळे चंद्रकांत प्रभाकर | १९२ ते १९५ |
| ४३ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. बर्वे ए.पी. | १९६ ते २०० |
| ४४ | यशवंतरावांचे राजकीय विचार | प्रा.डॉ. मिसाळ निवृत्ती विनायक | २०१ ते २०२ |
| ४५ | यशवंतरावांची राजकीय जडणघडण | प्रा.डॉ.शेळके संगिता | २०३ ते२०४ |
| ४६ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'यशवंतराव चव्हाण'यांची कामगिरी | डॉ. साळे मीना | २०५ ते२०७ |
| ४७ | यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणदृष्टी | प्रा.काटकर तात्यासाहेब शिवाजी | २०८ ते२१० |
| ४८ | यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक योगदान | प्रा. पाटील संजय शांताराम | २११ ते२१४ |
| ४९ | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र कृष्णाकाठ | डॉ. भालसिंग वैशाली श्रीकृष्ण | २१५ ते२२३ |
| ५० | 'ग्रामीण शिक्षण' व 'शेती' बाबत यशवंतराव चव्हाण यांचे विचार | डॉ.ताहेर एच.पठाण | २२४ ते२२७ |
| ५१ | यशवंतराव चव्हाण यांचे ललितगद्य:एक गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार | प्रा. आडविलकर सारिका | २२८ ते२३७ |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani
३६



# यशवंतराव चव्हाणांचे राजकीय विचार

प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.
राज्यशास्त्र विभाग, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

**प्रस्तावना :—**

महाराष्ट्र राज्याचे भाग्यविधाते, मुख्यमंत्री, भारताचे उपपंतप्रधान व पुरोगामी विचारवंत म्हणून ज्यांनी आपली ओळख निर्माण केली असे सृजनशील नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण हे होय. राजकीय सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, सहकार, कृषी, साहित्य अशा सर्व क्षेत्रामध्ये यशवंतरावांनी आपले विचार मांडले आहेत व कार्य केले आहे. एक सुसंस्कृत राजकारणी म्हणून आजही त्यांची सर्वसामान्यांमध्ये ओळख आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाला मापदंड घालून देण्याचे कार्य यशवंतराव चव्हाणांनी केले. तसेच पुरोगामी विचार महाराष्ट्रात रूजविला. त्यामुळेच आजही भारतीय राजकारणात महाराष्ट्राचे वेगळेपण टिकून आहे.

यशवंतराव चव्हाणांनी राजकारण, समाजकारण करत असतांना आपली देशनिष्ठा, बुध्दिनिष्ठा, नीतिनिष्ठा आणि ध्येयनिष्ठा ढळू दिली नाही. नम्रता कृतज्ञता, विनयशीलता, संवेदनशीलता यातून येणारी नैतिक राजकारणाची कास यशवंतराव धरतात म्हणूनच म्हटले जाते की, 'यशवंतरावांचे राजकारण हे बेरजेचे होते, ते फोडाफोडीचे नव्हते.' लोकशाहीवर त्यांची दृढ विश्वास व श्रध्दा आहे. यशवंतराव चव्हाणांनी आपल्या एकूण राजकीय कारकिर्दीमध्ये लोकशाही, लोकशाही, समाजवाद, सहकार, धर्मनिरपेक्षता, सत्तेचे विकेंद्रीकरण, सामाजिक न्याय आदी राजकीय संकल्पनांसंबंधी आपले विचार मांडून त्यांचा राजकारणात पुरस्कार केला. कोणताही राजकीय विचार त्यांनी अंध्दविश्वासाने स्वीकारला नाही तर तो डोळस व आपल्या व्यक्तिमत्त्वाला साजेल अशाच पध्दतीने स्वीकारला आहे. म्हणून त्यांच्या राजकीय विचारांचे वेगळेपण आपणाला दिसून येते.

**१. लोकशाहीसंबंधी विचार :—**

राजकीय लोकशाहीस सामाजिक व आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे असे यशवंतराव मानतात. तेव्हाच खरी लोकशाही अस्तित्वात येईल असेही म्हणतात. "लोकांचे लोकांसाठी लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही" ही लोकशाहीची व्याख्या त्यांना मान्य नाही तर लोकशाही म्हणजे "एकमेकांच्या विचारविनिमयाने चालणारा राज्यकारभार आहे. असे ते मानतात. लोकशाहीचा अर्थ केवळ एक शासनाचा प्रकार म्हणून होत असेल तर तो मान्य नाही असेही ते म्हणतात.

**२. लोकशाही समाजवाद :—**

यशवंतराव चव्हाणांची आर्थिक विकासाची परिकल्पना लोकशाही समाजवादाची आहे. त्यांना कार्लमार्क्सचा समाजवाद मान्य नाही, तर समाजवाद म्हणजे सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारामुळे त्याचा लाभ सर्व लोकांना होऊन सर्व लोकांचे कल्याण साध्य झाले पाहिजे या स्वरूपाचा आहे. भारतीय परिस्थितीला

प अशा समाजवादी तत्वज्ञानाला लोकशाहीची जोड देण्याचे कार्य रावांनी केले. चीन व रशियाप्रमाणे हुकमी समाजवाद स्वीकारला नाही.

Sonpeth Pin-431516

**सहकारासंबंधी विचार :—**

आधुनिक महाराष्ट्राची उभारणी करत असताना यशवंतराव चव्हाणांनी सहकार' या तत्वाची पायाभरणी केली, शिक्षण, उद्योग, कृषी यासाठी सहकारी तत्वांवर संस्थाची निर्मिती केली. देशातील मनुष्यबळाचा वापर सामूहिक स्वरूपात झाला तर लवकरात लवकर विकास होतो म्हणून यशवंतरावांनी सर्वसामान्य लोकांना शासन व प्रशासन यात सामावून घेतले. आज संपूर्ण भारतात महाराष्ट्र सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. त्यांचे संपूर्ण श्रेय यशवंतराव चव्हाणांनाच जाते. यामुळेच डॉ.प.चि. शेजवलकर म्हणतात. ''यशवंतरावनी 'महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रात निर्माण केलेले चैतन्य अतुलनीय असे आहे.''

**धर्मनिरपेक्षता :—**

राजकारण कसे असावे याविषयी यशवंतरावांचे विचार अत्यंत स्पष्ट असे आहेत. देशाचे राजकारण सर्वसामावेशक, जातिभेदविहरीत समतोल साधणारे असावे असे यशवंतराव नेहमी म्हणत राजकीय पक्षांमध्ये आणि नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नता असावी पण वैयक्तिक कटुता किंवा वैर असता कामा नये यावर त्यांनी सतत भर दिला.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :—**

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे असे यशवंतराव मानत. यासाठीच देशात सर्वप्रथम सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग करून स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती केली. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका यांची प्रत्यक्ष अमंलबजावणी करून यशवंतरावांनी सत्तेचे विकेंद्रीकरण केले. पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून सामान्य लोकांना सत्तेत सामावुन घेतले यामूळे समाजातील उपेक्षित, वंचित, शोषित घटकाला सत्तेत वाटा मिळाला. सत्ता विकेंद्रीत झाली. यामुळे भारतात लोकशाही अधिक परिपक्व होण्यासाठी मदत झाली.

**सामाजिक न्याय :—**

यशवंतराव चव्हाण यांनी जवळ जवळ ३८ वर्षे सार्वजनिक जीवनात कार्य केले. या काळात विविध पदावर ते राहिले पण त्यांनी कधीही समाजातील गरीब, वंचित व उपेक्षित घटकाकडे दुर्लक्ष केले नाही. याउलट त्यांची आर्थिक सामाजिक, राजकीय शैक्षणिक परिस्थिती कधी उंचावत येईल याचाच विचार केला. आपल्या सत्तेचा वापर त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केला.

यासाठी १९५५ मध्ये 'कुळकायदा' १९६१ मध्ये कमाल जमीन धारण कायदा १९६२ मध्ये सफाई कामगार कायदा यासारखे विविध कायदे करुन समाजातील अत्यंत वंचित घटकाला न्याय देण्याचे कार्य केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज व म.ज्योतिबा फुले यांचा सामाजिक न्यायाचा लढा पुढे नेण्याचे कार्य सुध्दा यशवंतराव चव्हाणांनी केले असे म्हणता येईल.

**समारोप :—**

२० व्या शतकात नवोदित स्वातंत्र्य मिळालेल्या राष्ट्रातील नवसमाज निर्मिती हा एक महत्त्वाचा प्रश्न जगापुढे होता. तेव्हा भारतासारख्या नव स्वतंत्र देशामध्ये जे काही महान नेतृत्व उदयास आले त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागले. भारतीय लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या राजकीय मूल्यांना आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवून यशवंतराव चव्हाणांनी कार्य केले.

यशवंतराव चव्हाणांनी केवळ राजकीय नाही तर आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आदी क्षेत्रामध्ये आपल्या विचारांचे योगदान दिले आहे. त्यांच्या सारखा अभ्यासू, व्यासंगी, नीतिमान राजकारणी आज विरळच आहे. असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :—**


- सहयाद्रीचे वारे — यशवंतराव चव्हाण
- यशवंतराव इतिहासाचे एक पान — रामभाऊ जोशी
- यशवंतराव चव्हाण राजकारण व साहित्य — भा.ल.भोळे
- यशवंतराव ते विलासराव — मधुकर भावे


Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani ★

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani